**<u>सं.फौ.ख.क्र.७१३/२०२१</u>**
शासन–वि–किरण रांधवन.
नि.क्र.१४ लगत.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – चंद्रभागा सोपान आटोळे,
वय – ५० वर्षे, व्यवसाय – घरकाम,
राहणार– रावणगाव, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. घटना ही चार वर्षापूर्वी दुपारी एक वाजता पुणे हायवेच्या सर्वीस रोडवर माळवणे यांच्या शेताजवळ घडली होती. मी त्यावेळी दवाखान्यात पायी जात होते. त्यावेळी सर्वीस रोडवरुन आरोपी किरण त्याच्या मोटारसायकलवरुन मोबाईल फोनवर बोलत समोरुन आला आणि त्याने मला धडक दिली. त्यामुळे मी खाली पडले. मला पडल्यामुळे डोक्यावर मार लागला. म्हणून मी सांगळे डॉक्टरांकडे गेले व त्यानंतर दौंड येथे उपचाराकरिता आले. दोन चार दिवसानंतर मी पोलीस स्टेशनला जाऊन आरोपीविरुध्द फिर्याद दिली. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. साक्षीदाराने आरोपीला ओळखले आहे. आरोपी आमच्या गावचा आहे. आता मला वाचून दाखविण्यात आलेल्या फिर्यादीतील मजकूर मी सांगितल्यानुसार खरा व बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे. त्यास **<u>नि. १५</u>** देण्यात येते. तसेच आता मला वाचून दाखविण्यात आलेली छापील खबर माझ्या सांगण्याप्रमाणे खरी व बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे. त्यास **<u>नि. १६</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. जे. के. थोरात यांच्यामार्फतः–</u>**

२. मी कोणत्या तारखेला आजारी पडले होते हे मला आता नक्की आठवत नाही. माझे पोट दुखत होते. हे म्हणणे खरे आहे की, आजारपणामुळे मला अशक्तपणा आला होता. मी गोळया औषधे घेतल्या नव्हत्या. त्यासाठी दवाखान्यात जात होते. माझ्या घरापासून सांगळे यांचा दवाखाना एक ते दीड किमी अंतर होते. मी एकटीच जात होते. मी सर्वीस रोडच्या उजव्या बाजूने जात होते. हे म्हणणे खरे आहे की, धडक कोणी दिली हे मी स्वतः पाहिले नव्हते. मला गावक–यांकडून आरोपीचे नाव समजले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या सर्वीस रोडवरुन अनेक दुचाकी वाहने आणि शाळकरी मुले मोटारसायकलवरुन जात असतात. हे म्हणणे खरे आहे की, धडक लागल्यामुळे मी बेशुध्द पडले होते. मला दवाखान्यात कोणी घेऊन गेले त्यांची नावे मी सांगू शकत नाही. दवाखान्यात प्रथमोपचार इंजेक्शन व गोळया देऊन करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे

की, त्यानंतर मी घरी गेले व दुस–या दिवशी ६ तारखेला दौंड येथील सरकारी व खाजगी दवाखान्यात गेले. फिर्याद देण्यासाठी मी ६ तारखेच्या संध्याकाळी पोलीस स्टेशनला गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, गावातील लोकांनी मला आरोपीने धडक दिल्याचे सांगितले. ज्या गावकरीने मला आरोपीचे नाव सांगितले त्याचे नाव मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना दि. ०५.०९.२०२४ ला घडली आणि तक्रार दि. ०८.०९.२०२४ ला दिली. माझी तब्येत बरी नसल्यामुळे फिर्याद देण्यास तीन दिवसाचा उशीर झाला. रावणगाव येथील पोलीस आउटपोस्टला जाऊन तक्रार दिली होती. गावातील पोलीस पाटील आणि सरपंचांना माझ्या अपघाताची माहिती दिली नव्हती. मला धडक देणारे मोटारसायकल कोणती होती ते मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोटारसायकलवर कोण व किती माणसे होती हे मी नक्की सांगू शकत नाही.

३. मी कुरकुंभकडे जात असताना पश्चिमेकडून पूर्वेकडे जात होते आणि मला उजव्या बाजूला धडक दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी आजारी असल्यामुळे अशक्तपणा आला होता व मला रस्त्याने जात असताना चक्करदेखील येत होते.

प्रश्न – तुम्हांला चक्कर येऊन तुम्ही पडला होता का

उत्तर – चक्कर आल्यामुळे मी पडले व नंतर गाडीची धडक बसली.

४. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणत्याही गाडीची धडक बसली नव्हती व मी खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– १७.०५.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.